INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December 2020

Vol. 7 Issue 4



**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Dictionary of Research Journal Indexing (DRJI)
- www.worldcat.org
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December 2020

Vol. 7 Issue 4

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

Cover Photo : Hathras Rape Case (U.P. India) Source : Internet

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

**Co-Editors -**

- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** - Professor of English, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | प्रेमचंदयुगीन हिन्दी कथा-साहित्य में ग्राम्यजीवन | डॉ. भिमराव मानकरे | 125 |
| 27 | प्रेमचंद की कहानियों में दलित चेतना | डॉ. परविंदरकौर महाजन | 129 |
| 28 | धनगर जनजातियों में सामाजिक एवं सांस्कृतिक स्थितियों में परिवर्तन के संकेत | डॉ.गणपत राठोड | 132 |
| 29 | दिनकर के काव्य में राष्ट्रीय चेतना | डॉ.महेंन्द्रसिंग पवार | 136 |
| 30 | बीसवी सदी के अंतिम दशक का साहित्य : भाषा व शिल्प | डॉ. संतोष पवार | 140 |
| 31 | हिंदी में अनुदित दलित मराठी आत्मकथाओं में चित्रित समस्याएँ | डॉ.भारत खिलारे | 144 |
| 32 | वेदना एकाकीपन की : कृष्णा सोबती की नज़र में | डॉ. संतोष पवार | 152 |
| 33 | नारी समस्या और कृष्णा सोबती के उपन्यास | अनिता देवी | 158 |
| 34 | ज्ञानप्रकाश विवेक की ग़ज़लों में व्यक्त जीवन-दर्शन | डॉ. जे.व्ही.पाटील, अनिल सूर्यवंशी | 163 |
| 35 | 'दरमियाना' में किन्नरों की राजनैतिक चेतना | डॉ. विलास कांबळे | 169 |
| 36 | 'मुन्नी मोबाईल' - कॉल सेंटरों में कार्यरत युवाओं के काले जीवन की कहानी | डॉ.सन्मुख मुच्छटे | 176 |
| | **मराठी विभाग** | | |
| 37 | लोकसाहित्य – अक्षर वाङ्मय | डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 180 |
| 38 | लोकतत्त्व व इहवादाचा अनुबंध | स्वाती लवंगे, डॉ. दिलीप पवार | 186 |
| 39 | भिल्ल जमातीच्या संस्कृतीतील होळी : एक सण | डॉ. चांगदेव मुंढे | 193 |
| 40 | ओतारी समाजातील विवाहपद्धती | प्रा.विक्रम ओतारी | 198 |
| 41 | आदिवासी बोलीभाषा : वास्तव आणि आव्हाने | डॉ. सुलतान पवार | 202 |
| 42 | श्रीचक्रधरस्वामींचे व्यक्तिदर्शन | डॉ.अंजली पांडे | 208 |
| 43 | पसायदान : एक आकलन (२) | डॉ. पुरुषोत्तम जुन्रे | 212 |
| 44 | सामाजिक क्रांतीच्या युगस्त्री : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | डॉ.श्रीकांत गायकवाड | 218 |
| 45 | सोपान खुडे ह्यांचे नाटक 'सम्राट अशोक' | राहुल गायकवाड | 226 |
| 46 | भारत सासणे यांच्या कथेतील जीवनदर्शन | डॉ. बाबाराव ठावरी | 231 |
| 47 | मराठी कथेची उत्क्रांती | डॉ. तीर्थराज कापगते | 236 |
| 48 | 'रानसय' मधून व्यक्त होणारे ग्रामवास्तव | प्रा. ज्ञानेश्वर मुंढे | 244 |
| 49 | कामगार कवितेतील सामाजिक जाणिवा : एक दृष्टिक्षेप | डॉ. दिलीप पवार | 248 |
| 50 | ल. सी. जाधवांच्या कादंबऱ्यांचे आशयसूत्र व त्यांचे वेगळेपण | मिनाक्षी गोणारकर | 253 |
| 51 | तौलनिक साहित्य आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास | डॉ. प्रकाश जाधव | 258 |
| 52 | डॉ. दादा गोरे यांचे कथाविश्व | डॉ. पुरुषोत्तम जुन्रे | 261 |
| 53 | 'डाळ' : एक ग्रामीण कादंबरी | डॉ. रावसाहेब ननावरे | 268 |
| 54 | मराठी साहित्य आणि मानसशास्त्र परस्पर संबंध | डॉ. भास्कर शेळके | 271 |
| 55 | भिल्ल संस्कृतीतील काही प्रतीके | डॉ. चांगदेव मुंढे | 280 |
| 56 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवकल्याणविषयक आर्थिक विचार | प्रा.विलास सोळुंके | 284 |
| 57 | 'स्वच्छ भारत मिशन' योजनेचे तात्त्विक अधिष्ठान | डॉ. पंडित लावंड | 290 |
| 58 | 'आत्मनिर्भर भारत अभियान' : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. रामदास मुकटे | 296 |
| 59 | 'कोविड १९' चा भारताच्या वाहन उद्योग व जी.एस.टी.संकलनावरील परिणाम | डॉ. शामराव वायसे | 301 |
| 60 | जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यामधील ग्रामीण विकासात शेततळ्यांची भूमिका - एक भौगोलिक अभ्यास | डॉ. रंजीता जाधव | 306 |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Vol. 7, Issue 4
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

# लोकसाहित्य — अक्षर वाङ्मय

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
M.A. (Mar., Soc., His., Pol.-Sci., Eco.),
B.Ed., M. Phil., NET., Ph.D.
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय,
मौदा, जि. नागपूर — ४४१ १०४
मो.नं.: 9422816697
email- vyankateshpotfode28@gmail.com

**भूमिका :**

या लेखामध्ये लोकसाहित्य हे प्राचीन काळापासून आजतागायत जनमानसात प्रभावीपणे टिकून असणारे कसे अक्षर वाङ्मय आहे. या दृष्टीने विचार मांडले आहेत. त्यासाठी आदिवासी साहित्य, संत साहित्य, प्राचीन व आधुनिक साहित्यात 'लोकसाहित्य' कसे आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना :**

आधुनिक काळामध्ये कविता, कथा, कादंबरी, नाटके, आदिवासी साहित्य आंबेडकरवादी साहित्य, संत साहित्य, लोकसाहित्य यांचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास व संशोधन केले जाते. इतर वाङ्मयाच्या मानाने थोड्याशा दुर्लक्षित असणाऱ्या लोकसाहित्याकडे काही संशोधकानी लोकसाहित्य हा किती महत्त्वपूर्ण साहित्यप्रकार आहे याकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत केले.

**व्याख्या :**

डॉ. नांदापुरकर– "लोकवाङ्मय म्हणजे माझ्या दृष्टिने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय तेच लोकवाङ्मय होय. त्याचा कर्ता लोकच. अर्थात लोक समाजातील अज्ञात अशा व्यक्ती. यास्तव लोकांनी तयार केलेले, लोकभाषेतील, लोकांच्या परंपरेबरोबरच चालत आलेले जे वाङ्मय तेच लोकसाहित्य होय. लोकवाङ्मयाच्या या प्रकारात लोककथा, कहाण्या, उखाणे आणि लोकगीते येतात. याचाच अर्थ असा की, लोकसाहित्यात आपणास लोकजीवनाचे, संस्कृतीचे आणि जीवन जगण्याच्या विविध पद्धतींचे दर्शन घडते."[१]

लोक म्हणजे शहरी किंवा ग्रामीण भागात राहात असणारी जनता हा अर्थ लोकसाहित्यात अभिप्रेत आहे. ही जनता निसर्गाच्या सान्निध्यात राहून धर्म, पंथ, चालीरिती, विचार, भाषा, बोली, वंश, व्यवसाय अशा समान गोष्टीने एकत्र असतात. यांची संस्कृती समान असते. अशा समान विचारधारेतून परंपरेने साहित्याचा प्रवाह त्यांनी टिकवून ठेवलेला असतो. त्याला इंग्रजीमध्ये Folklore म्हणतात. त्याला 'लोकवाङ्मय', 'लोकतत्त्व', 'लोकविद्या', 'लोकवार्ता', 'लोकायन', 'लोकसंस्कृती' असे वेगवेगळ्या भाषा–प्रदेशामध्ये पर्यायी शब्द वापरले जातात.

**वैशिष्ट्ये :**

१) 'लोकसाहित्य' हा शब्द अत्यंत व्यापक अर्थाने वापरला जातो. 'तोंडाने काढले व हाताने पेरले' यावर लोकसाहित्याची मुळ बैठक आहे. लोकसाहित्य हे सर्वसामान्य जनतेचे साहित्य असून त्यामध्ये लोक हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. लोकशाहीच्या व्याख्येप्रमाणे 'लोकांनी, लोकाकरिता, लोकांद्वारे निर्माण झालेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य होय.'



Scanned with OKEN Scanner

E-ISSN :
2348-7143
Oct.-Nov.-Dec.
2020

२) कथा आणि गाणी ही लोकसाहित्याचा आत्मा आहेत. Folk tale is the father of all fiction and the folk - song is the mother of all poetry." काव्याचा आत्मा हा लोकगीते आहेत. कधी कधी आपण भाषा, बोली न समजताच संगीताच्या ताल–सुरांवर समान होवून जातो ही शक्ती संगीतामध्ये आहे.

३) लोकसाहित्याचा निर्माता हा अज्ञात असतो. कुणी एखाद्या निर्मात्याने हे साहित्य निर्माण केले असले तरी त्याला समुहाने आपले स्वतःचे साहित्य म्हणून स्वीकारले असते. वेळप्रसंगी त्यामध्ये बदल करण्याचे स्वातंत्र्य लोकांना असल्यामुळे ते जास्त जिव्हाळ्याचे वाटते. लोकसाहित्य हे केवळ जुने पुराणे साहित्य आहे म्हणून लोकसाहित्य ठरीत नाही तर त्यात साहित्याची सर्व मूल्ये समाविष्ट असतात म्हणूनच कितीतरी काळ निघून गेला तरी हे वाङ्मय नष्ट होत नाही उलट जुन्या पिढीकडून नव्या पिढीने सहजरित्या स्वीकारले असते. यामध्ये जीवनाच्या विविध क्षेत्राचे प्रतिबिंब उमटले असल्यामुळे त्या त्या प्रसंगी या साहित्याची पुनरावृत्ती केली जाते. एखाद्या नदीच्या प्रवाहाप्रमाणे अखंड हा प्रवाह चालत असतो वाहत्या पाण्याचे जे महात्म्य आहे ते लोकसाहित्याचे आहे. त्यामध्ये आपली संस्कृती, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, टीकाटिपण्णी, हेवेदावे, विनोद, चुटकुले, प्रश्नोत्तरे अशा सर्व अंगाचा समावेश असतो. जितक्या प्रमाणात आपण या साहित्याचा अभ्यास करीत जातो तितक्या प्रमाणात त्याची गोडी दिवसेंदिवस वाढत जाते. मौखिक परंपरेतून चालत आलेले लोकसाहित्य आधुनिक काळात लिपिबद्ध करून संग्रहीत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य लोकसाहित्याचे उपासक करीत आहेत. हे कार्य त्यांनी केले नाहीतर कितीतरी साहित्याला पुढील पिढी मुकली जाईल अशी भिती वाटते.

४) लोकसाहित्यामध्ये बोलीभाषेला प्राधान्य असते. प्रमाणभाषेपेक्षा लोकांना बोली ही अत्यंत जवळची वाटते. बोलीभाषेला प्राधान्य दिल्यामुळे निर्मितीमध्ये सुस्पष्टता जाणवते. लोकसाहित्याच्या कक्षा या विशिष्ट प्रदेश, भाग यापुरत्या मर्यादित राहात नाही. त्या विशाल आणि व्यापक असल्यामुळे भौगोलिक मर्यादा त्यांनी ओलांडल्या असतात. एखाद्या देशातील गीत आपण दुसऱ्या देशामध्ये नेवून सादर केले तरी तेथील जनता त्याला प्रतिसाद देते. त्यांनाही ते आपल्या जवळचे वाटते. तसेच लोकसाहित्यावर निर्मात्याचे नाव लिहिलेले नसल्यामुळे त्यावर कुणी आपला हक्क सांगू शकत नाही. अत्यंत प्राचीन काळापासून टिकून असणारे हे लोकसाहित्य त्यातील गुणवैशिष्ट्यामुळे अक्षर वाङ्मय ठरले आहे.

५) लोकसाहित्य हे संस्कृतीचे अभिन्न अंग असल्यामुळे सण, उत्सव, विधी प्रसंग, लग्न सोहळे, श्रमपरिहार अशा वेगवेगळ्या प्रसंगी लोकगीते गायली जातात. अलिखित स्वरूपातील हे वाङ्मय मौखिक परंपरेने, कधी–कधी वारसा परंपरेने हस्तांतरीत होत असते. त्यासाठी विशेष असे प्रयत्न केले जात नाही. उलट हे स्वीकारतांना जी आपलेपणाची भावना असते ती सहजतेतून आलेली असते. जुन्या पिढीकडून नवीन पिढीकडे इतक्या सहजतेने दिले जाते की नवीन पिढीला आपण काही नवीन शिकत आहोत असे मुळीच वाटत नाही. इतक्या सहजतेने हे हस्तांतरण होते. शेतकरी श्रमपरिहारासाठी गाणी गातात त्यामध्ये नवीन पिढीतील तरुण–तरुणी सहभागी होत असतात. त्यांना आपण करीत असणारे श्रम हलके वाटत असतात. आपण श्रम करीत आहोत याची त्यांना जाणीवही नसते इतकी सहजता त्यामध्ये असते.

६) लोकसाहित्य ही समुहाची निर्मिती असते. मौखिक किंवा अलिखित वाङ्मय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असून त्यामध्ये एकाची निर्मिती राहत नाही. यामध्ये समुहाला कालमानानुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य असते. स्वीकारणाऱ्या पिढीला हे साहित्य आपले साहित्य



Scanned with OKEN Scanner

वाटते. ठरलेल्या साहित्यामध्ये काही बाबीची भर घालून किंवा कमी करून ते व्यक्त केल्या जाते. ही उणीव किंवा भर करणे यामध्ये प्रेक्षक किंवा श्रोत्यांना कुठेही आगाऊपणा वाटत नाही. त्यामध्ये वर्तमानकालीन संदर्भाची भर असल्यामुळे त्याची जास्त गोडी वाटते. त्यामुळे श्रोते, प्रेक्षक यांना ही नवीन कलाकृती न वाटता त्या लोकसाहित्याशी एकरूप होतात.

व्याप्ती :

लोकसाहित्याची व्याप्ती ही विशाल आहे. लोकसाहित्य हे सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक अशा विविध अंगाने व्यापक असा साहित्यप्रकार आहे. मानवाच्या उत्पत्तीपासून चालत आलेले हे साहित्य आहे. यामध्ये लोककथा, लोकगीते, लोककला, म्हणी, वाक्प्रचार, स्त्री गीते, वगनाट्ये, दशावतार, भारूड, गोंधळ, लळीत, बहुरूपी, लग्नविधी, अंत्यसंस्कारविधी, पुरातन गोष्टी, अंगाई गीते, भाकड कथा, लोकवचने, लोकोक्ती, पुरातन कथा, परंपरा, यात्रा–जत्रा यातील गाणी, दंतकथा, वीरकथा, प्राणीकथा, विधीकथा, व्रतकथा, पौराणिक कथा, शाहिरी वाङ्मय, तमाशा, वासुदेव, भराडी अशा विविध लोककलाचा, भाषांचा, ओळींचा, अभ्यास लोकसाहित्यात केला जातो. लोकसाहित्याची रंगभूमी ही अत्यंत प्राचीन काळापासून चालत आली आहे. वरील कलांच्या व्यतिरिक्त कितीतरी लोककलांचा अभ्यास, संशोधन यामध्ये केले जाते. या सर्वांचे मूल्यमापन करणे, व्याप्ती ठरविणे, उगम व विकास पाहणे, लोककलामध्ये झालेले चढउतार यांचे संशोधन करणे, अशा विविध अंगानी लोकसाहित्यात अभ्यास होतो. त्याचा अभ्यास करतांना संदर्भ काळजीपूर्वक तपासावे लागतात. अन्यथा चुकीचे निष्कर्ष निघतात. आपण पूर्वी घेतलेले संदर्भ व नवीन संदर्भ यांचा ताळमेळ तपासूनच निष्कर्ष, मूल्यमापन करावे लागते.

पौराणिक साहित्य :

जेव्हापासून समाज अस्तित्वात आला तेव्हापासून लोकसाहित्याची परंपरा अस्तित्वात आहे. प्राचीन काळातील वाङ्मयामध्ये, पोथी, पौराणिक ग्रंथ यामध्ये त्याची बिजे सापडतात. बौद्धजातके, महाभारत, रामायण, पौराणिक ग्रंथ यामध्ये कितीतरी लोककथा, लोकगीते यांचे संदर्भ आहेत. पौराणिक साहित्याला तर लोकसाहित्याची गंगोत्री म्हटले जाते. प्राचीन साहित्यामध्ये तत्कालीन जीवन, संस्कृती, चालीरिती यांचे चित्रण, सामुहिक भावना व्यक्त केल्या आहेत.

उपासना गीते :

सन, उत्सवाच्या निमित्ताने देवदेवतांची उपासना केली जाते. देवादिकांच्या पूजा अर्चा पद्धतीमध्येही लोकगीताचा समावेश आहे.

"शेजारीन पुसे, आज सडासारवन कसे
आज बाई एकादशी असे...."

यातील व्रतवैकल्याच्या निमित्ताने दोन महिलांमधील संवादातून प्रश्नोत्तरे आहेत. त्या पाठीमागची भावना व्यक्त केली आहे. यातून निर्माणकर्त्या परमेश्वराबद्दलचा श्रद्धाभाव व्यक्त होतो.

संतसाहित्य :

लोकसाहित्याची बीजे ही संत साहित्यामध्येही आहेत संत ज्ञानदेवापासून तर संत तुकारामापर्यंत सर्व संताच्या साहित्यात लोकसाहित्याचा वापर केला आहे. संत एकनाथानी भारूडे, गवळणी, गोंधळ, वासुदेव अशी लोकपरंपरेशी नाते सांगणारी भारूडे, भजने लिहिली. त्याचप्रमाणे शाहिरी वाङ्मयात लावणी, गवळणी यांचा वापर करून लोकप्रबोधनाचे काम केले.



Scanned with OKEN Scanner

E-ISSN : 2348-7143
Oct.-Nov.-Dec. 2020

बहुरूपे धारण करणारा तो बहुरूपी. वेगवेगळ्या स्वरूपाचे सोंग धारण करून त्या मोबदल्यात मिळणाऱ्या वस्तू, पैशावर आपली उपजिविका बहुरूपी करतात. त्यांच्याकडे कलागुणांचा खजिना असतो. बहुरूप्याबद्दल समर्थ रामदास म्हणतात–

"खेळतो एकला बहुरूपी रे। पाहता अत्यंत साक्षपी रे ।।धृ।।
सोंग धरता नाना परी रे । बहुतचि कला कुसरी रे ।।

**आदिम साहित्य :**

समाज, संस्कृती आणि भाषा या त्रिसुत्रीची घट्ट वीण असून त्यामध्ये आदिम समाजाच्या अभ्यासासोबत लोकसाहित्य, लोकसमुह यांचा अभ्यास केला जातो. आदिमकाळापासून लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपामध्ये आहे. आदिवासी हे निसर्गाच्या सहवासामध्ये एकरूप असतात. त्याचा निर्माता एक नसतो तर त्याचा आस्वादकही एक नसून ती समुहाची कृती व निर्मिती असते. आदिवासींच्या लोकसाहित्यामध्ये गेयता, लयबद्धता, सामुहिकता या मुल्यांचे संवर्धन व संगोपन केले जाते. आदिवासीचे गाणे, सण, धार्मिक उत्सव अशा कार्यक्रमामधून आदिवासीचे जीवन व्यक्त होते. लोकसाहित्यामध्ये वात्सल्य, विडंबन, शौर्यगाथा, श्रृंगार, विनोद अशा विविध विषयांचा समावेश असतो.

**आदिवासी लोकगीते :**

महाराष्ट्रीयन लोकसंस्कृतीमध्ये गोंधळी, वाघ्या–मुरळी, पोतराज, वासुदेव, नंदीवाले, पांगुळ, डहाका म्हणणारे, तुंबडीवाले यांनी लोकगीतांची परंपरा जपली आहे. गोंधळ हा प्रकार महाराष्ट्रामध्ये अत्यंत लोकप्रिय लोकगीत प्रकार आहे. गोंधळाच्या पूर्वरंगामध्ये गान, देवाची स्तुती, आख्यान, पौराणिक कथा, प्रसंग, नकला, विनोद असतो. गोंधळाच्या गवळणीमध्ये मिस्किल विनोद केला जातो.

"कृष्णाला पाहून झाली ग वेडी,
पहिल्या पहिल्या भेटीत, रंगली का ग साडी।।"

यातून मनोरंजनाबरोबर देवदेवतांचे नातेसंबंध कौटुंबिक पातळीवर रंगविले जातात व प्रेक्षकामध्ये उत्साह निर्माण केला जात असतो. आदिवासी हे निसर्गपूजक आहेत. निसर्गातील अनाकलनीय, गूढ तत्त्वांना देव किंवा भीतिपोटी राक्षस समजून त्यापासून आरिष्ठ होवू नये म्हणून पूजाअर्चा केल्या जातात. त्याचे उल्लेख आदिवासींच्या गीतांमध्ये वारंवार येतात. आदिवासीमध्ये कातकरी, ठाकर, वारली, कोकणी, कोरकू, पायरा, भिल्ल, माडिया यासारख्या कितीतरी आदिम जमातीमध्ये लोकगीते म्हटली जातात. आदिवासीमध्ये शीव शक्तीची उपासना केली जाते. आदिवासी देवी पार्वतीला मुलगी मानतात. त्यांच्या गीतामध्ये गिरिजा, महादेव, पार्वती, भोला, शंकर असे उल्लेख वारंवार येतात.

"गिरिजा गोंडीन देवा रे माह्या, संभाने ठेवली,
दोन बायकांची चाल ह्यान, साऱ्या दुनियेला लावली"

शंकर–पार्वतीला आई–वडील संबोधले जाते. तसेच देवाचे मानवीयकरण केले आहे.

**पुरुषांची लोकगीते :**

स्त्रियांच्या लोकगीताप्रमाणे पुरुषांचे स्वभाव, कार्य, सण, यावर आधारीत लोकसाहित्य भरपूर प्रमाणात आहे. पोळ्याच्या झडत्या, गुराख्याची गाणी, महादेवाची गाणी, शेतकरी गीते यामधून पुरुषांनी आपल्या संस्कृतीबद्दलचा आदर, कृतज्ञता व्यक्त केली आहे. या लोकगीतातून मनोरंजन व मनातील सृष्ट, दृष्ट विचार व्यक्त केले जातात. अहि–नुकुल भाव न होवून पुढील जीवन शेतकरी आनंदाने जगतो. दिवाळी, पोळ्याच्या निमित्ताने गुरा–ढोरांप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. पोळ्याला झडत्या म्हणतात.



Scanned with OKEN Scanner

"पोया रे पोया, पुरणाच्या पोया
पाटील मारते, पाटलीनले डोळा ऽऽ"

अशा झडत्यामधून मिस्किलभावनाही व्यक्त होते. गुराखी गायी चारतांना वेगवेगळी लोकगीते म्हणतो. दिवाळीला गायी, म्हशींच्या संबंधातील भावना व्यक्त करतो.

**लोककथा :**

लोककथा यात भाषा, प्रदेश, लिंग, काळ, संस्कृतीनुसार विविधता दिसून येते. लोककथेची संहिता ही मौखिक व अलिखित असते. ती संहिता परंपरेने हस्तांतरीत होते. लोककथातून बोध आणि मनोरंजनासोबत, नीतितत्त्वे, अद्भूतता सांगितली जाते. यामध्ये कथानक घटना यांना प्राधान्य असते यात गीत कमी असते. लोककथामध्ये प्रतिमा, प्रतीके, मिथके मोठ्या प्रमाणात असतात. लोककथा या पौराणिक, सामाजिक, देव–देवतांच्या कथा यावर आधारित असतात.

'घरची अस्तुरी, पाण्याचा हौद ।
परायाची नार, घडीभरची मौज ।'

अशा सामाजिक लोकगीतातून नीतिमूल्ये, कौटुंबिक जीवनाचे चित्रण केले जाते. पौराणिक लोककथा या असामान्य व्यक्तिमतत्त्वावर आधारित असतात. पुराणातील अनेक पात्राबद्दलची श्रद्धा कथेच्या घटना, प्रसंगातून व्यक्त केली जाते. गोंधळी, भराडी, वासुदेव, पोतराज, वाघ्या, मसनजोगी, तुंबडीवाले हे आपल्या उपास्यदेवतांची कथा, गीते सांगून दान मागून उदरनिर्वाह करतात. युद्धकथा, कीर्तिकाव्ये, स्तुतिकथा, शौर्यकथा यावर पोवाडे किंवा कथा सांगितल्या जातात. राष्ट्रीय विषय हे पोवाड्यांचे कथाविषय ठरतात. त्यातून देशभावनाही जागृत केली जाते.

**लोकनाट्यः**

बहुजन समाजाच्या मनोरंजनासाठी 'लोकनाट्य' ही कला प्राचीन काळापासून सादर केली जाते. लोकनाट्यामध्ये लोकसंगीत, वाद्य, लोकनृत्य अशी लोकानुवर्ती कला समाविष्ट असते. लोकनाट्ये ही जुन्या व नवीनांचा समन्वय करून प्रवास करीत आहे. यामध्ये लवचिकता, समयसुचकता, गतीशिलता या मूल्याचा वापर केला जातो. यामध्ये गायन, शैली, कथन, अभिनय, नृत्य ही लोकभूमीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. बिहारमध्ये विदेशिया, उत्तरप्रदेशात रास, स्वाग, भांड, राजस्थानमध्ये झुमर व रासनृत्य, गुजरातमध्ये भवई, महाराष्ट्रात दशावतार व लळीते या नृत्यप्रकाराचा लोकनाट्यामध्ये अंतर्भाव होतो. महाराष्ट्रातील दशावतार, भारूडे, जागरण अशा लोककलांचा समावेश होतो. तसेच महाराष्ट्रात तमाशा, भारूडे, खडीगंमत, गोंधळ ही लोकरंगभूमीमध्ये महत्त्वाची लोकनाट्ये आहेत.

**डहाकागीते :**

लग्नासारख्या मंगलप्रसंगी गोंधळ, डहाका सादर करून जागरण करतात. लग्नामध्ये मंडप पूजन प्रसंगी जागरण करून देवादिकांना, पूर्वजांना आमंत्रित केले जाते. संध्याकाळी सुरू होणारे जागरण हे पहाटेपर्यंत सुरू असतात. कुटुंबातील सर्व सदस्य, नववधू, नवरदेव यामध्ये सहभागी होतात व मंगलपूजन करतात.

**डोयरे :**

दिवाळीपासून त्रिपुरी पोर्णिमेपर्यंत डोयरे म्हटले जातात. गोंड, गोवारी, प्रधान वाद्याच्या तालावर नाचून, शेतकऱ्याकडून देणगी मिळावी म्हणून गुराखी डोयरे म्हणतात–

'भाट भिकारी येते दादा, मुठ मुठ दाणे नेते,
बारा महिण्याचा गोवारी येते, धगधग काळीज होते.'



Scanned with OKEN Scanner

बाराबलुतेदारीमध्ये सर्वांना त्यांच्या हक्काचे बलुते मिळते. त्याचप्रमाणे गुराख्यांनाही मालकाकडून देणगी मिळते.

**तुंबडीगीते :**

'तुंबडी' हे वाद्य असून या वाद्याच्या तालावर महादेवाचे भक्त गाणे म्हणतात. तुंबडीवाले हिंदू देवांची पूजा करतात. एका हातात चिपळ्या व दुसऱ्या हातात तुंबडी घेवून 'एक पैसा देना, एक देना, आला तुंबडीवाले नाना' असे म्हणत दान मागतात. भोपळ्यासारखे हे फळ असून मध्यप्रदेशातील जंगलातून आणतात व त्याचे 'तुंबडी' हे वाद्य बनवितात.

वाघ्या–मुरळी, वासुदेव, पोतराज, पांगुळ, भराडी, धनगर यांच्या गीतामधून लोकसाहित्य ओतप्रोत भरलेले आहे. प्राचीन साहित्यामध्ये लोकसाहित्य जसे आहे तसेच आधुनिक बालगीते, बडबडगीते, म्हणी, वाक्प्रचार, स्त्री–पुरुष यांची गाणी यामधून लोकसाहित्याला टिकवून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम होते.

**निष्कर्ष :**

एकूण लोकसाहित्यामध्ये सामुहिकता, बोलीभाषेचा मुक्त वापर, ध्रुवपदाची पुनरावृत्ती, श्रमपरिहारासाठी गीते, कथा, उखाणे याद्वारे अक्षर वाङ्मय बनले आहे. होळी, पोळा, तीळसंक्रात, नागपंचमी, कृष्ण जन्माष्ठमी, दिवाळी, राखी पोर्णिमा अशा विविध सणांच्या निमित्ताने लोकसाहित्य टिकवून ठेवले जाते. तसेच लग्नसमारंभ, बारसे, मुंज अशा प्रसंगी लोकगीताचा वापर होत असल्यामुळेच लोकसाहित्य हे अक्षर वाङ्मय ठरले आहे.

**संदर्भ टीपा :**

1. (डॉ.) कालभूत पुरुषोत्तम – ''लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन''– पृष्ठ क्र. ३

RESEARCHJOURNEY

**संदर्भ ग्रंथ :**

1. (डॉ.) कुळकर्णी मदन, वाटाणे राजेंद्र, – ''राष्ट्रीय अन्य मराठी साहित्य संशोधन संमेलन–स्मरणिका''– विदर्भ संशोधन मंडळ, वेस्ट हायकोर्ट रोड, जवाहर वस्तीगृहाजवळ, नागपूर (२०१३) किंमत १००/–
2. (डॉ.) कालभूत पुरुषोत्तम– लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन– विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. (१० जाने. २००७) किंमत ३००/– रु.



Scanned with OKEN Scanner